## मसालावर्गीय पिकांचे सुधारीत व संकरीत वाण

### हळद – कृष्णा




| | |
|---|---|
| प्रसारीत वर्ष | १९८४ |
| संशोधन केंद्राचे नांव | कृषि संशोधन केंद्र, कसबे डिग्रस, ता.मिरज, जि. सांगली |
| जमिन | मध्यम काळी पाण्याचा चांगला निचरा होणारी,सामू ६.५ ते ७.५ असावा |
| हवामान | उष्ण व दमट हवामान चांगले मानवते. मध्यम पाऊस व चांगल्या स्वच्छ प्रकाशात या पिकाची वाढ उत्तम होते. सरासरी तापमान २५ ते ३५ अंश सेल्सिअस असावे. |
| पेरणी/ लागवडीचा कालावधी | १५ मे ते जूनचा पहिला आठवडा |
| प्रती एकर बियाणे | ८ ते १० क्विं |
| पिकाचा कालावधी | -- |
| उत्पादकता | ओल्या हळदीचे हेक्टरी उत्पादन ३०० ते ३२५ क्विंटल तर वाळलेल्या हळदीचे हेक्टरी उत्पादन ७५ ते ८० क्विंटल |
| वैशिष्टे/ गुणधर्म | कडप्पा या वाणापासून निवड पध्दतीने विकसित केलेला वाण. या जातीची पाने आकाराने रुंद, रंगाने हिरवट व सपाट असतात. एका कदांस १० ते १२ पाने येतात, हळकुंडे लांब, जाड व प्रमाणबध्द असतात. हळकुंडांचा गाभा पांढरट पिवळा असतो, हळकुंडाच्या दोन पेरांमधील अंतर इतर वाणांच्या तुलनेने जास्त, कुरकुमीनचे प्रमाण २.८० टक्के |
| विशेष उपलब्धी | ही जात करपा रोगास बळी पडणारा वाण |

## हळद – फुले स्वरूपा



| | |
|---|---|
| **प्रसारीत वर्ष** | २००४ |
| **संशोधन केंद्राचे नांव** | कृषि संशोधन केंद्र, कसबे डिग्रस, ता.मिरज, जि. सांगली |
| **जमिन** | मध्यम काळी पाण्याचा चांगला निचरा होणारी,सामू ६.५ ते ७.५ असावा |
| **हवामान** | उष्ण व दमट हवामान चांगले मानवते. मध्यम पाऊस व चांगल्या स्वच्छ प्रकाशात या पिकाची वाढ उत्तम होते. सरासरी तापमान २५ ते ३५ अंश सेल्सिअस असावे. |
| **पेरणी/ लागवडीचा कालावधी** | १५ मे ते जूनचा पहिला आठवडा |
| **प्रती एकर बियाणे** | ८ ते १० क्विं |
| **पिकाचा कालावधी** | -- |
| **उत्पादकता** | ओल्या हळदीचे हेक्टरी उत्पादन ३५८.३० क्विंटल तर वाळलेल्या हळदीचे हेक्टरी उत्पादन ७८.७२ क्विंटल |
| **वैशिष्टे/ गुणधर्म** | दुग्गीराला या दक्षिण भारतातील जातीमधून निवड पध्दतीने ही जात विकसित केली आहे, मध्यम उंच वाढणारी आहे, सरळ वाढीची सवय, पानांचा रंग गर्द हिरवा असून पानांची संखया ११ ते १३ असते, लांब व चमकदार हळकुंडे, हळकुंडाच्या गाभ्याचा रंग गर्द पिवळसर असतो, कुरकुमीनचे प्रमाण ५.१९ टक्के इतके आहे, हळद उतारा २२ टक्के इतका आहे |
| **विशेष उपलब्धी** | या जातीमध्ये पानांवरील करपा रोगास तसेच कंदमाशी या किडीस सहनशिल असल्याचे गुण दिसून आले आहे. |

## पानवेल – कृष्णा पान




| | |
|---|---|
| **प्रसारीत वर्ष** | २००१ |
| **संशोधन केंद्राचे नांव** | औषधी व सुगंधी वनस्पती योजना, मफुकृवि, राहुरी |
| **जमिन** | सुपीक, उत्तम निचरा होणारी |
| **हवामान** | थंड व दमट हवामान, आर्द्रता ६०–७० टक्के |
| **पेरणी/ लागवडीचा कालावधी** | जून–जुलै |
| **प्रती एकर बियाणे** | १५ ते ३० हजार रसरसीत शेंडे प्रति हेक्टरी |
| **पिकाचा कालावधी** | आर्थिक आयुष्यमान १० वर्षे |
| **उत्पादकता** | ७१.१८ लाख पाने/हेक्टरी |
| **वैशिष्टे/ गुणधर्म** | कपूरी वाणापेक्षा २७ टक्के जास्त उत्पादन, कपूरी सुधारित वाणापेक्षा २० टक्के अधिक उत्पादन, पानाची लांबी १४.५ सेंमी व रुंदी १२ सेंमी आणि शेंड्याकडे निमुळती व आकर्षक, कमीत कमी गबाळू पानांची संख्या, पानांचा अधिक टिकाऊपणा, फिक्कट हिरवा रंग, मर रोगास मध्यम प्रतिकारक्षम, पानवेल डेकूण व सुत्रकृमीस कमी प्रतिकारक्षम |
| **विशेष उपलब्धी** | महाराष्ट्रातील पठारी विभागात लागवडीसाठी प्रसारीत. |